पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८३**

**सभावृत्तांत**

दिनांक – **१९/०८/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **१९/०८/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५) मा.तरस बाळासाहेब जयवंत
६) मा.प्रसाद शेट्टी
७) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
८) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
९) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१०) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
११) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१२) मा.काळे विमल रमेश
१३) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१४) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.तुपे – सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे -सहा.आयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.केदारी, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.शेख, मा.गायकवाड, मा.रत्नपारखी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.बोदाडे, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २८) :- प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील रंगास्वामी पेरुमल पिल्ले सांस्कृतिक भवन भाड्याने देणेबाबत...

विषय क्रमांक २९) :- से.क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.२ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे या कामासाठी सुधारित मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३०) :- रेनबो बीआरटीएस या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची व त्यावरील सुरक्षितता उपाययोजनांची माहिती रेडीओ,स्थानिक केबल टि.व्ही. व वृत्तपत्र, यु ट्युब या सारख्या प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध करणेसाठीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३१) :- यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये चालवल्या जाणा-या सी.पी.एस. कोर्स साठी अफिलेशन फी भरणेबाबत...

विषय क्रमांक ३२) :- सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३) :- तरतूद वर्ग करणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३४) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१७७ दि.११/८/२०१५ रद्द करणेबाबत व पिं.चिं. मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाढ,घट मंजुर करणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३५) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१२५ दि.४/८/२०१५ मधील मजकूर वगळणेबाबत व मजकूर समाविष्ट करणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३६) :- पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाढ,घट मंजुर करणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३७) :- पिंपरी वाघेरे येथील कोंडवाडा लिजवर देणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८) :- ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ (२९४ रखवालदार मदतनीस पुरविणेबाबत) – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) :- ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ (३७१ रखवालदार मदतनीस पुरविणेबाबत) – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) :- सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१२० दि.४/८/२०१५ रद्द करणेबाबत व पिं.चिं. मनपाच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड मुख्यालयातील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२) :- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३) :- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४) :- प्रभाग क्र.२४ (रामकृष्ण मोरे सभागृह) मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे या कामास वास्तुविशारद नेमणेबाबत...

विषय क्रमांक ४५) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१३३ दि.४/८/२०१५ रद्द करणेबाबत व सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड क्षेत्रिय कार्यालयातील स्थापत्य विभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६) :- अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंतच्या खर्चास मान्यता देणेबाबत - मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७) :- तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.प्रसाद शेट्टी, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

--------

दिनांक ११/८/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१८२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – १२१८८      विषय क्रमांक – १
दिनांक – १९/०८/२०१५      विभाग – स्थापत्य
सुचक - मा.रमा ओव्हाळ      अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/५५/२०१५ दि.११/६/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली पुणे आळंदी रस्ता ते खाणीचा रस्ता डांबरी करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८९      विषय क्रमांक – २
दिनांक – १९/०८/२०१५      विभाग – क्रीडा
सुचक - मा.अनिता तापकीर      अनुमोदक - मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६८/२०१५ दि.०२/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११४ दिनांक १७/०७/२०१५ नुसार, मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण झालेने परिसरातील नागरिकांसाठी व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, दरपत्रक मागवून करारनामा न करता मे.आदित्य स्पोर्टस्, आकुर्डी, पुणे ३५ यांचेकडून एकूण र.रु.१,९३,९०९/- (अक्षरी र.रु.एक लाख त्र्यान्नव हजार नऊशे नऊ फक्त) इतक्या रकमेचे व्यायाम साहित्य खरेदी केले असून सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९०  विषय क्रमांक – ३
दिनांक – १९/०८/२०१५  विभाग – क्रीडा
सुचक - मा.बाळासाहेब तरस  अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६९/२०१५ दि.०२/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११५ दिनांक १७/०७/२०१५ नुसार, मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण झालेने परिसरातील नागरिकांसाठी व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, दरपत्रक मागवून करारनामा न करता मे.आदित्य स्पोर्टस्, आकुर्डी, पुणे ३५ यांचेकडून एकूण र.रु.१,९३,८५६/- (अक्षरी र.रु.एक लाख त्र्यान्नव हजार आठशे छप्पन्न फक्त) इतक्या रकमेचे व्यायाम साहित्य खरेदी केले असून सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९१  विषय क्रमांक – ४
दिनांक – १९/०८/२०१५  विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक – मा.सविता साळुंके  अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/०४/५४४/२०१५ दि.२७/७/२०१५
विषय – पिं.चिं.म.न.पा.च्या पाणीपुरवठा विभागाकडील शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र, से.२३ पाणीपुरवठा विभाग या लेखाशिर्षकांमधून भांडवली विषयक कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९२  विषय क्रमांक – ५
दिनांक – १९/०८/२०१५  विभाग – पाणीपुरवठा
सुचक - मा.कैलासभाऊ थोपटे  अनुमोदक - मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२५/२०१५ दि.२८/०७/२०१५
विषय - प्रभाग क्र.६ डुडुळगाव टाकीवरुन वितरण होणा-या भागात जलवाहिनी टाकणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९३  विषय क्रमांक – ६
दिनांक – १९/०८/२०१५  विभाग – पाणीपुरवठा
सुचक - मा.संपत पवार  अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३६४/२०१५ दि.३१/०७/२०१५
विषय - प्रभाग क्र.६ मोशी पुर्व व पश्चिम बनकरवस्ती भागात जलनलिका टाकणेबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९४ विषय क्रमांक – ७
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५८६/२०१५ दि.०७/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.मंत्री, संरक्षण, भारत सरकार यांना दि.२८/०५/२०१५ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध प्रश्ना संबंधी झालेल्या बैठकीसाठी आवश्यक माहिती पुस्तक स्वरुपात तात्काळ मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्झुमर स्टोअर, संत तुकाराम नगर, पिंपरी यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता तयार करुन घेणेत आलेल्या कलर झेरॉक्स, ४५ पानांचे पुस्तक, मल्टी कलर पेपर, (४५ पानांची २८ पुस्तके स्पायरल बायडींगसह) कामी आलेल्या एकुण र.रु.१९,७४०/- (अक्षरी र.रु. एकोणीस हजार सातशे चाळीस फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९५ विषय क्रमांक – ८
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९९५/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/०५/२०१५-१६ अन्वये, डांगे चौकापासून ते मुकाई चौकापर्यंत बी.आर.टी. मार्गावरील फुटपाथ मध्ये विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले चर बुजविणे. फुटपाथची दुरूस्ती करणे (डांबरीकरणातील ट्रेचेस दुरूस्तीसह) कामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु.६९,८४,६६८/- (अक्षरी र.रू. एकोणसत्तर लाख चौ-याऐंशी हजार सहाशे अडुसष्ट) पेक्षा २३.४५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५६,१४,१०२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९६ विषय क्रमांक – ९
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९९६/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/०६/२०१५-१६ अन्वये, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी बी.आर.टी.एस. कॉरीडॉर वरील विविध सेवावाहिन्यां साठी खोदलेले चर पुर्ववत करणेकामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु.१,२६,९७,९५८/- (अक्षरी र.रू.एक कोटी सव्वीस लाख सत्यान्नव हजार नऊशे अठ्ठावन्न) पेक्षा २३.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,०१,३४,३०४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार

मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९९७/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/०७/२०१५-१६ अन्वये, राजीव गांधी पूलापासून डांगे चौकापर्यंत बी.आर.टी. मार्गावरील फुटपाथ मध्ये विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले चर बुजविणे, फुटपाथची दुरूस्ती करणे (डांबरीकरणातील ट्रेचेस दुरूस्तीसह) कामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु. ७०,०१,७७४/- (अक्षरी र.रू. सत्तर लाख एक हजार सातशे चौ-याहत्तर) पेक्षा २४.१३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.५५,७७,८५८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९८ विषय क्रमांक – ११

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक - मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक - मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९९४/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१५-१६ मधील काम क्र.१ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील बी.आर.टी.एस. कॉरिडोवर बस थांबे उभारणे व अनुषंगिक कामे करणे या अंतर्गत बस स्टेशनसाठी साईनेजेस पुरविणेकामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु.९९,१९,०५७/- (अक्षरी र.रू.नव्याण्णव लाख एकोणीस हजार सत्तावन्न) पेक्षा २१.६०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ८१,६५,३६८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१९९ विषय क्रमांक – १२
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकिय
सुचक - मा.संपत पवार अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/२/कावि/२१६/२०१५ दि.३०/७/२०१५

मा.अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कोटेशन क्र.मसाभां/२/कावि/२०७/२०१५ दि.१७/०७/२०१५ अन्वये, मे.स्पेक्ट्रम एन्टरप्रायजेस, चिंचवडगाव, पुणे यांनी प्रति स्केअर फुट करिता ३४/- असा लघुत्तम दर सादर केलेला आहे. प्राप्त लघुत्तम दरानुसार मनपाच्या वैद्यकीय विभागांतर्गत येणा-या सर्व दवाखाने/रुग्णालयांना आवश्यक लागणारे प्रत्येकी ४ याप्रमाणे एकुण ३० दवाखाने रुग्णालयांना असे एकुण १२० वॉटरप्रुफ बोर्ड करिता प्रति स्क्वे. फुट करीता र.रु.३४/- याप्रमाणे एका बोर्ड (१८"X२४") करिता र.रु.१०२/- प्रमाणे एकुण र.रु. १२२४०/- इतका खर्च अंदाजे अपेक्षित आहे. सदरचा खर्च 'शासकिय योजनांची अंमलबजावणी'या लेखाशिर्षातुन करता येणे शक्य आहे. त्यानुसार मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-ग़ा वॉटरप्रुफ बोर्डचे येणा-ग़ा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०० विषय क्रमांक – १३
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/२७८/१५ दि.३१/०७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१४-१५ मधील अ.क्र.५ अन्वये, प्र.क्र.६० सांगवी गावठाण येथील व्यायामशाळा व तालमीचे नुतनीकरण करणेकामी मे.ए.आर.नायडू (नि.र.रु.९,३३,७०७/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सातशे सात) पेक्षा (-)२९.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने नियमानुसार व निविदेतील अटी शर्तीप्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२२०१ विषय क्रमांक – १४
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय
सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/२७५/१५ दि.३१/०७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१४-१५ मधील अ.क्र.१० अन्वये, प्र.क्र.६० सांगवी येथील ग्रंथालयाचे नुतनीकरण करणेकामी मे.ए.आर.नायडू (नि.र.रु.५,६०,२२४/- (अक्षरी र.रू.पाच लाख साठ हजार दोनशे चोविस) पेक्षा (-) २९.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने नियमानुसार व निविदेतील अटी शर्तीप्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल

करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०२ विषय क्रमांक – १५

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय

सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/२५१/१५ दि.२१/०७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१४-१५ मधील अ.क्र.८ अन्वये, प्र.क्र.४० खराळवाडी मधील सार्वजनिक स्वच्छतागृह किरकोळ दुरुस्ती कामे करणेकामी मेसांडभोर कंन्स्ट्र. (नि.र.रु.९,१०,२८६/- (अक्षरी र.रू.नऊ लाख दहा हजार दोनशे शहाऐंशी) पेक्षा (-)४७.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने नियमानुसार व निविदेतील अटी शर्तीप्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०३ विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/२७३/१५ दि.३१/०७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१४-१५ मधील अ.क्र.११ अन्वये, प्र.क्र.६० सांगवी येथील विविध शाळासमोर विद्यार्थी रस्ता अलांडणी पथ तयार करणेकामी मे.देव कंन्स्ट्र. (नि.र.रु.९,३३,७०७/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सातसे सात) पेक्षा (-)३३.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने नियमानुसार व निविदेतील अटी शर्तीप्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक - मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक - मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/४७२/२०१५ दि.३/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१६/२०१४-१५ मधील अ.क्र.१६ अन्वये, प्र.क्र.१३ निगडी गावठाण येथील आण्णा भाऊ साठे वसाहत २५६,५७६ गाळे राजनगर येथील इमारती व शौचालये दुरुस्ती कामे करणेकामी मे.पांडूरंग एन्टरप्रायजेस (नि.र.रु.२०,०५,५४६/- (अक्षरी र.रू.वीस लाख

पाच हजार पाचशे शेहेचाळीस) पेक्षा ४४.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ११,१३,०७८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक - मा.संपत पवार अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/३४६/२०१५ दि.३१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे, निगडी येथे साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव दि.३/८/२०१५ ते ७/८/२०१५ या कालावधीत आयोजित करणेत आला आहे. या अतंर्गत आयोजित कार्यक्रमामधील व्याख्याते व कलाकारांचे मानधन, बक्षिसे, फ्लेक्स बॅनर, स्मृतीचिन्हे, चहापान नाष्टा व भोजन व्यवस्था इ. करीता थेट पद्धतीने अंदाजे र.रु.८,६०,०००/- (अक्षरी र.रु.आठ लाख साठ हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/८१३/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बीआरटीएसची यशस्वी अंमलबजावणी करणेसाठी तांत्रिक सल्लागार श्री.प्रतीक दवे यांची नियुक्ती पिं.चिं.मनपा व पी.एम.पी.एम.एल (PMPML) सर्वकष मदत व मार्गदर्शन करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.७०४८, दि. १७/०६/२०१४ व क्र.१०८५४, दि.२७/०२/२०१५ नुसार केलेली आहे. त्यांना र.रु.१.२५ लाख अधिक सेवाकर याप्रमाणे फी पोटी येणा-या खर्चास व एकूण २ वर्ष कालावधीसाठी प्रत्येक सहा महिन्याला मा.स्थायी समितीची स्वतंत्र मान्यता घेऊन नेमणूक करणेस व सदरचा खर्च SUTP GEF Grant मधून करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. श्री.प्रतीक दवे दि.०१/०९/२०१४ पासून या पदावर काम करीत आहेत. त्यांची सहा महिन्यांची मुदत दि.३१ ऑगस्ट २०१५ रोजी समाप्त होत आहे. त्यांना पुढील सहा महिन्यांसाठी (दि.०१/०९/२०१५ ते दि.२९/०२/२०१६) बीआरटीएस करीता सल्लागार पदी नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०७ विषय क्रमांक – २०
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय
सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/निविदा/कावि/१३३/२०१५ दि.१०/०८/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/४/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.१५ दत्तवाडी आकुर्डी येथील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.सांडभोर कंस्ट्रक्शन (नि.र.रु.९,३४,३७०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख चौतीस हजार तीनशे सत्तर) पेक्षा ३८.४६% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.६,०३,७६२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०८ विषय क्रमांक – २१
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०७/२०१५ दि.१०/०८/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२७.७.२०१५ ते दि.२.८.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०७/२०१५ दि.१०.८.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२०९ विषय क्रमांक – २२
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इक्षेका/०५/कावि/११८/२०१५ दि.११/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

इ क्षेत्रीय कार्यालय नव्याने स्थापन झालेने कार्यालयीन कामकाजाचे सोयीचे दृष्टीने कार्यशाळा विभागाने कळविले नुसार वाहनांची खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयामार्फत मे.टाटा मोटर्स लि. यांचे कडून कोटेशन/दरपत्रक मागविणेत आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व अतिक्रमण पथकासाठी आवश्यक असलेल्या वाहनांचा तपशील खालिल प्रमाणे.

| अनु.क्रमांक | अधिकारी | वाहनाचा प्रकार | किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | क्षेत्रीय अधिकारी | टाटा झेस्ट | ५,८१,९८१/- | |
| २. | अतिक्रमण | ४०७ पोलिस व्हॅन पिंजरा | १३,१६,९१९.३८ | |
| | एकुण | | १८,९८,९००.३८ | |

(अक्षरी र.रु.अठरा लाख अठठयाण्णव हजार नऊशे रुपये अडतीस पैसे फक्त)

वरील अधिका-यांकरीता व अतिक्रमण कामकाजा करीता लागणारी वाहने खरेदी कामी कोटेशन/दरपत्रकानुसार एकुण २ वाहनांची एकुण र.रू.१८,९८,९००.३८/- (अक्षरी र.रु.अठरा लाख अठठयाण्णव हजार नऊशे रुपये अडतीस पैसे फक्त) वाहने खरेदी खर्च आहे. वरील दोन वाहनांपैकी मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे वाहन खरेदी मा.स्थायी समिती ठराव क्र.५८७२ दिनांक ७/२/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे. तरी ४०७ पोलिस व्हॅन पिंजरा वाहनाची किंमत र.रू.१३,१६,९१९.३८/- अशी आहे. सदरचे वाहन मे.टाटा मोटर्स यांचे कडुन खरेदी करुन आगाऊ रक्कम अदा करुन खरेदी करणेस येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१० विषय क्रमांक – २३
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – जलनिःसारण
सुचक - मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक - मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/९९६/१५ दि.११/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.१/३/२०१५-१६ अन्वये, वॉर्ड क्र. २०, २१ मधील जलनिःसारण व्यवस्था सुधारणा कामे करणेकामी M/s ANANT BALKRISHNA BAHIRAT (नि.र.रु.२७,९६,८७३/- (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख शहान्नव हजार आठशे त्र्याहत्तर) पेक्षा ३१.७५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२०,०४,३०९/- पर्यत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निधारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रककम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२११ विषय क्रमांक – २४
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य
सुचक - मा.संपत पवार अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अ.क्षे.का./आ/१/कावि/५६८/२०१५ दि.०१/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सन-२०१५ च्या अनुषंगाने दि. ०८/०७/२०१५ रोजी देहू येथून पंढरपूर कडे संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान झाले असून दि.०९/०७/२०१५ रोजी आकुर्डी येथे मुक्काम झाला होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत संत तुकाराम महाराज पालखीचे मुक्कामाच्या ठिकाणी सालाबादप्रमाणे स्वच्छता, व्यवस्था, किटकनाशक औषधांची फवारणी व स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेत येते. यासाठी परीसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहा बरोबरच आवश्यकतेनुसार काही ठिकाणी फिरते शौचालय उपलब्ध करुन देण्यात येतात. याकामी दि.०९/०७/२०१५ रोजी एकूण १७ ठिकाणी फिरते शौचालय उपलब्ध करणेची आवश्यकता होती. तथापि त्यावेळेस १२ फिरते शौचालय (प्रत्येकी १० सीटस) उपलब्ध झाले असून उर्वरीत ०५ ठिकाणी फिरते शौचालय खाजगी एजन्सीकडून भाडेतत्वावर घेणे आवश्यक होते. त्यानुसार मे.3-D ENVIORNMENTAL SERVICES,कोथरुड, पुणे यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा न करता प्रती सीटस (Portable

Toilets) प्रती दिन र.रु.२,२००/- या दराने (भाडे, वाहतुक व स्वच्छता) दि.०९/०७/२०१५ रोजी एकूण २० सीटस भाडे तत्वावर घेतल्याने त्यांना एकूण र.रु.४४,०००/- (अक्षरी र.रू.चव्वेचाळीस हजार) अदा करण्यात आले असून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१२ विषय क्रमांक – २५

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय

सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/३५०/१५ दि.१३/०८/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३/२०१४-१५ मधील अ.क्र.२१ अन्वये, प्र.क्र.३२ सँडविक कॉलनी परिसरात नामफलक वाचनालय बेंचेस बसविणे व थरमाप्लास पेंट देणेकामी मे.सांडभोर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,५०,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख पन्नास) पेक्षा ४३.९९ % कमी) या ठेकेदारा बरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१३ विषय क्रमांक – २६

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/३५१/१५ दि.१३/०८/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३/२०१४-१५ मधील अ.क्र.१६ अन्वये, प्र.क्र.३२ मध्ये किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणेकामी मे.सांडभोर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,५०,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख पन्नास) पेक्षा ४३.९९% कमी) या ठेकेदारा बरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१४ विषय क्रमांक – २७

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय

सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/३५२/१५ दि.१३/०८/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३/२०१४-१५ मधील अ.क्र.१८ अन्वये, वॉर्ड क्र.३५ धावडेवस्ती येथे भैरवनाथ विद्यालय मार्ग येथे नविन पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.देव कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,०७,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा ३८.२७% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – १२२१५ विषय क्रमांक – २८
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक - मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/०४/कावि/२५३/२०१५ दि.१७/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.२८, मासुळकर कॉलनी येथील रंगास्वामी पेरुमल पिल्ले सांस्कृतिक भवन मिळकतीचे प्रती दिन भाडे र.रु.३,६००/- अधिक प्रचलित सेवाकर, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), फ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अभिप्रायानुसार पाणी वापर शुल्क व कार्यकारी अभियंता (विद्युत), फ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अभिप्रायानुसार वीज वापर शुल्क आकारणी करणेस तसेच अनामत रक्कम म्हणून बिनव्याजी र.रु.२,०००/- स्विकारणेत येऊन मागणीनुसार नागरिकांना/संस्थांना भाड्याने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१६ विषय क्रमांक – २९
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३
सुचक - मा.सुनिता गवळी अनुमोदक - मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जशुके/४१५/२०१५ दि.१९/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.२०/२० २०१३-१४ मधील अ.क्र.१३, से.क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.२ व केमिकॅल हाऊस खाजगीकरणाने चालविणेकामी मे.श्री.विनय इंजि. सर्व्हीसेस प्रा.लि. या ठेकेदाराकडून निविदा दराने सुधारीत र.रु.५५,३४,५६९/- चे सुधारीत खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१७ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – स्थापत्य-बीआरटीएस
सुचक - मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/८५४/२०१५ दि.१९/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे करसंकलन विभागाने यापूर्वी प्रसार माध्यम म्हणून रेडीओ वन एफ.एम.९४.३ या रेडीओ चॅनेलवरुन करसंकलन माहिती प्रसिद्ध करणेत आलेने करसंकलन विभागाला व पर्यायाने मनपाला फायदा झालेला आहे व मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढणेस मदत झालेली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता रेनबो बीआरटीएस या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची व त्यावरील सुरक्षितता उपाययोजनांची माहिती उपलब्ध प्रसार माध्यमांमध्ये देणेचे नियोजन व त्याकरीता खालीलप्रमाणे आवश्यक बाबींचा विचार करुन अंदाजपत्रक तयार केले असून त्याकरीता र.रु.१६.२५ लाख इतका खर्च येणार आहे.

**Promotions and Outreach Implementation Plan**

| S.No. | Details of Activities | Costing |
|---|---|---|
| 1 | Radio Mirchi + Radio One Campaign for 12 Days (Including Interviews of Passengers) | 10.05 Lacs (+ SERVICE TAX) |
| 2 | Newspaper Advertisements (in Leading Dailies) for Launch Day | 5.0 Lacs |
| 3 | Hoardings (20 location in the city – 10000 Sq.ft.) | 1.20 Lacs (+ SERVICE TAX) |
| | Total Costing | 16.25 Lacs (+ SERVICE TAX) |

तरी उपरोक्त बाबींचे दरपत्रक संबंधित एजन्सींकडून प्राप्त झालेले असून सदरचे काम सुरु करणेपूर्वी संबंधित एजन्सी यांना आगाऊ स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदरचा खर्च GEF Grant मधून करता येईल. याकरीता जागतिक बँकने व मा.अति.सचिव, नगरविकास विभाग, भारत सरकार यांनी तत्वतः मान्यता दिलेली आहे. तसेच दि.२९ व ३० जुलै २०१५ रोजीच्या जागतिक बँकेसमवेतच्या आढावा बैठकीमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. त्यानुषंगाने सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१८ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १९/०८/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सुचक - मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक - मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी३/कावि/९९१/२०१५ दि.१०/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये चालवल्या जाणा-या सी.पी.एस. कोर्सकरीता सीपीएस ENROLLMENT करीता आवश्यक असणारी अफिलेशन फि एकुण र.रु.१४,४०,०००/- (अक्षरी चौदा लाख चाळीस हजार रुपये फक्त) ही डिमांड ड्राफ्टद्वारे कॉलेज ऑफ फिजिशियन अँन्ड सर्जन, मुंबई (सी.पी.एस.) यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२१९ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १९/०८/२०१५

सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२० विषय क्रमांक – ३३
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,०४,२५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२१ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१७७ दि.११/८/२०१५ रद्द करण्यास व पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.८,२५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२२ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१२५ दि.४/८/२०१५ मधील “(वाढ/घट र.रु.१६,००,०००/-)” हा मजकूर वगळण्यात यावा व त्याऐवजी “(वाढ/घट र.रु.१,६०,०००/-)” हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२३ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,६०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२४ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १९/०८/२०१५

सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पिंपरी वाघेरे येथील कोंडवाडा आदेश क्र.भूजि/५/कावि/१९१/२०१० दि.२९/६/१० अन्वये श्री.हनुमंत यशवंत वाघेरे यांना भाडे कराराने दिलेला होता. सदर करारनाम्याची मुदत दि.२८/६/२०१५ रोजी संपल्याने यापुढे म.न.पा. नियमानुसार श्री.हनुमंत यशवंत वाघेरे यांना पुढील ११ महिने किंवा म.न.पा. नियमानुसार लिजवर देण्यास व त्यांना म.न.पा. नियमानुसार भाडे व इतर म.न.पा.चे अटीस आधिन राहून मुदतवाढ व लिजवर कोंडवाडा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२५ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १९/०८/२०१५

सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा. विमल काळे

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११८०० दिनांक २३/६/२०१५ नुसार ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ (२९४ रखवालदार मदतनीस पुरविणे बाबत खालीलप्रमाणे संस्था एजन्सीज यांना वाटप करणेत आले होते. सदर मजकूर रकाना पाच (५) मध्ये नमूद केलेनुसार फक्त रखवालदार मदतनीस संख्या मध्ये बदल करणेत येत आहे. बाकी मजकूर या पुर्वीचे ठराव क्र.११८०० दिनांक २३/०६/२०१५ नुसार मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | संस्था/एजन्सी/ठेकेदार नाव | सेवाकर वगळता मासिक दर | मा.स्थायी समिती ठराव क्र.११८०० दि.२३/६/२०१५ अन्वये रखवालदार कर्मचारी संख्येस मान्यता | रखवालदार मदतनीस कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | मे.एल.एम.सी.सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. | १०,८००/- | ११५ | १०५ |
| २) | मे.श्रीकृपा सर्व्हीसेस | | ११४ | १०४ |
| ३) | मे.सैनिक इंटेलिजन्स सर्व्हीसेस प्रा.लि. | | २५ | ४५ |
| ४) | मे.बी.व्ही.जी. इंडिया | | ४० | ४० |
| | एकूण | | २९४ | २९४ |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२६ विषय क्रमांक – ३९
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.अनिता तापकीर अनुमोदक - मा. विमल काळे
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११७९९ दिनांक २३/६/२०१५ नुसार ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ (३७१ रखवालदार मदतनीस पुरविणे बाबत खालीलप्रमाणे संस्था एजन्सीज यांना वाटप करणेत आले होते. सदर मजकूर रकाना पाच (५) मध्ये नमूद केलेनुसार फक्त रखवालदार मदतनीस संख्या मध्ये बदल करणेत येत आहे. बाकी मजकूर या पुर्वीचे ठराव क्र.११७९९ दिनांक २३/०६/२०१५ नुसार मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | संस्था/एजन्सी/ठेकेदार नाव | ई-निविदा सुचना क्र.२/२०१४- १५ एल १ दरपत्रक | मा.स्थायी समिती ठराव क्र.११७९९ दि.२३/६/२०१५ अन्वये रखवालदार कर्मचारी संख्येस मान्यता | रखवालदार मदतनीस कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | मे.श्रीकृपा सर्व्हीसेस | ११२४.९९ | ६ | ६ |
| २) | मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. | | ९० | ११५ |
| ३) | मे.शुभम उद्योग | | ८५ | ८५ |
| ४) | मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. | | १५० | १२५ |
| ५) | मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा.लि. | | ४० | ४० |
| | एकूण | | ३७१ | ३७१ |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२७ विषय क्रमांक – ४०
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

महापालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२८ विषय क्रमांक – ४१
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.विमल काळे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१२० दि.४/८/२०१५ रद्द करण्यास व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजमधील विशेष योजना कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२२९ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ :- मा.विमल काळे व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

क क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२३० विषय क्रमांक – ४३
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ :- मा.विमल काळे व मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

क क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२३१ विषय क्रमांक – ४४
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/बक्षे/९/१७३/२०१५ दि.०१/०६/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रभाग क्र.२४ (रामकृष्ण मोरे सभागृह) मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणेकामी श्री.सचिन आपटे यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करुन नियोजन करणेस तसेच वास्तुविशारद श्री.सचिन आपटे यांना निविदापुर्व कामासाठी १ % व निविदा पश्चात कामासाठी १.३५ % देयक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२३२ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ :- मा. मा.अनिता तापकीर व मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२१३३ दिनांक ४/८/२०१५ रद्द करण्यास व ड क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२३३ विषय क्रमांक – ४६
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ :- मा. मा.अनिता तापकीर व मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील विशेष योजनेत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६,७८,८१,९८९/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२२३४ विषय क्रमांक – ४७
दिनांक – १९/०८/२०१५
सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ :- मा.प्रसाद शेट्टी व मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव-

मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील विशेष योजनेत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/ ७८ /२०१५
दिनांक - १९/०८/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.